




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार ३० मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# शरद पवार गटाचा दे धक्का? अखेर उमेदवार ठरले? यादी आली समोर



**दैनिक वादळ वार्ता मुंबई**

मुंबई : महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि ठाकरे गटाने लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. मात्र, शरद पवार यांनी अद्यापही आपली यादी जाहीर केलेली नाही. महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे गटाला 19, काँग्रेस 16 आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेसला 9 जागा असे जागावाटप झाले आहेत. तर चार जागांवर अजून निर्णय होणे बाकी आहे. यातील ठाकरे गटाने 17 जागांची यादी जाहीर केली आहे. तर काँग्रेसनेही 10 जागांची उमेदवारी यादी जाहीर केली. त्यामुळे शरद पवार यांच्या गटाचे कोण उमेदवार असणार याची उत्सुकताही आता संपणार आहे. शरद पवार गटाची पहिली यादी शनिवारी जाहीर होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.शरद पवार यांच्या गटाला जागावाटपामध्ये बारामती, शिरूर, सातारा, अहमदनगर, रावेर, दिंडोरी, बीड, वर्धा आणि माढा हे मतदारसंघ मिळाले आहे. यातील बारामतीच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे आणि शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. मात्र, अन्य उमेदवार कोण असणार याची यादी शनिवारी जाहीर केली जाणार आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील शनिवारी दुपारी चार वाजता पत्रकार परिषद घेणार आहेत. यावेळी ते उमेदवारांची नावे जाहीर करणार आहेत अशी माहिती सूत्रांनी दिली. बारामतीमधून सुप्रिया सुळे, शिरूरमधून अमोल कोल्हे, नगरमधून नीलेश लंके, दिंडोरीमधून भास्कर भगरे आणि भिवंडीतून बाल्या मामा उर्फ सुरेश म्हात्रे हे संभाव्य उमेदवार आहेत असेही या सूत्रांनी सांगितले.

माढा, बीड, रावेर, सातारा आणि वर्धा या मतदारसंघातील लोकसभेचे उमेदवार अद्याप निश्चित झालेले नाहीत. दरम्यान, अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांनी आपल्या समर्थकांसह शरद पवार यांच्या पक्षात परतले आहेत. हा अजितदादा यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

आमदार निलेश लंके यांना अहमदनगरचे विद्यमान खासदार सुजय विखे पाटील यांच्याविरोधात उमेदवारी देण्यात येणार आहे. अहमदनगरमध्ये विखे पाटील आणि लंके यांच्यात प्रमुख लढत असणार आहे. सुजय विखे पाटील यांच्या पत्नी धनश्री विखे यांनी जनसंपर्क मोहीम हाती घेतली आहे. तर, नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके या देखील शिवस्वराज यात्रेच्या माध्यमातून मतदारसंघ पिंजून काढत आहेत.

## लोकसभा निवडणूक

### भाजपच्या या खासदाराचे तिकीट बदलणार,



लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. महाराष्ट्रात भाजपने आपल्या २३ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. या उमेदवारांनी जोरदार प्रचार सुरु केला आहे. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेत्याच्या वक्तव्यामुळे भाजपच्या विद्यमान खासदारसमोर संकट निर्माण झाले आहे. जळगाव जिल्ह्यातील रावेर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रक्षा खडसे यांचे तिकिट ऐनवेळी बदलले जाणार असल्याचे संकेत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी केले आहे. रक्षा खडसे शरद

### महाविकास आघाडीचं राज्यात काही खरं दिसत नाही.



लोकसभा निवडणुकांचं मतदान सुरू व्हायला आत अवघे काही दिवस उरले आहेत. पहिल्या टप्प्यातील मतदान लवकरच होणार असून सर्वच पक्षांनी कंबर कसून तयारी सुरू केली आहे. अनेक पक्षांनी उमेदवारांची यादी जाहीर केली असली तरी जागावाटपावरून मविआमध्ये अद्याप धुसूफूस सुरु आहे. राज्यातील काही महत्वाच्या जागांवरून अद्याप त्यांच्यात एकमत झालेलं नाही. प्रत्येक पक्षाला मोक्याच्या जागांवर निवडणूक लढवायची आहे. त्यामुळे मविआमध्ये अद्यापही धुसफूस सुरू आहे. ठाकरे गटाने काही दिवसांपूर्वी त्यांच्या उमेदवारांची नावं जाहीर केली. मात्र सांगलीसह आणखी एक दोन जागांवरून अद्याप नाराजी आहे.

### ऐन निवडणूक काळात ठाकरेंना मोठा धक्का बडा नेता भाजपमध्ये प्रवेश करणार



देशात लोकसभा निवडणूक होत आहे. सगळीकडे निवडणुकीचं वारं वाहतंय. शिवसेना ठाकरे गटाने 17 उमेदवारांची यादी जाहीर झाली आहे. अशातच आता ऐन निवडणूक काळात ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटाचा बडा नेता आज भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. राजकीय वर्तुळात याबाबतच्या चर्चांना उधाण आलं आहे. उद्धव ठाकरे यांचा निकटवर्तीय, विश्वासू नेता भाजपमध्ये प्रवेश आज प्रवेश करणार आहे. मात्र हा बडा नेता कोण याबाबतची स्पष्टता आलेली नाही. या नेत्याचं नाव कळू शकलेलं नाही. पण राजकीय वर्तुळात चर्चांना मात्र उधाण आलं आहे.

## सौं प्रतिभा उरसळ – कुंजीर यांना पीएचडी पदवी प्राप्त

**दैनिक वादळ वार्ता मुंबई** विद्यापीठ मुंबई येथून शिक्षण शास्त्र या विषयात प्रतिभा गोरख उरसळ-कुंजीर यांनी पीएचडी पदवी प्राप्त केली आहे.त्यांना डॉ.चेतन उत्तमराव चव्हाण, सहयोगी प्राध्यापक, गोखले शिक्षण संस्थेचे शिक्षण शास्त्र व संशोधन महाविद्यालय परळ, मुंबई यांचे मार्गदर्शन लाभले.

'माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकीचा संस्थानिहाय वातावरण आणि व्यक्तिमत्त्व लक्षणे यामधील संबंधांचा अभ्यास' या विषयावर त्यांनी प्रबंध सादर केला होता.

सदरचे संशोधन हे दक्षिण मुंबई मधील ६०० माध्यमिक शिक्षकांशी निगडीत होते. प्रतिभा उरसळ यांचे वडील कै.श्री साहेबराव सखाराम कुंजीर व आई शांता कुंजीर हे पुरंदर तालुक्यातील आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या आईवडिलांकडून मिळालेला वारसा हा त्यांच्या मुलीने पी एच डी पदवी प्राप्त करून सार्थ ठरविला आहे.

प्रतिभा उरसळ यांनी मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे अध्यापनाचे कार्य केले आहे. तसेच सध्या पी वी डी टी महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, SNDT महिला विद्यापीठ येथे सहयोगी प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी SNDT महिला विद्यापीठात विविध समित्यांवर उदा. विद्यापीठाच्या एन.एस.एस समितीच्या सदस्य , तेजस्विनी स्पर्धेच्या विद्यापीठ पातळीवर परिक्षक म्हणून,विद्यापीठाच्या वर्धापन समितीच्या सदस्य , महाविद्यालय विकास समितीच्या सदस्य म्हणून काम केले आहे व करत आहेत.

## हिरकणी सौ. गीतांजली वाणी शुभंकरोती राज्यस्तरीय समर्थ नारी सन्मानाच्या मानकरी

**दैनिक वादळ वार्ता**

३० मार्च २०२४ रोजी शुभंकरोती साहित्य परिवार (संस्थापिका सौ. सोनाली जगताप) व नेशनल लायब्ररी बांद्रे (कार्यवाह प्रमोद महाडिक) यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी ३.३० वाजता राज्यस्तरीय समर्थ नारी सन्मान सोहळ्याच आयोजन करण्यात आलं आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक माननीय चंद्रकांतजी दादा वानखेडे भूषवणार असून प्रमुख पाहुणे प्रहार दैनिकाचे संपादक श्री. सुकृत खांडेकर आहेत. उदघाटन सौ. हेमांगी नेरकर यांच्याहस्ते होणारं आहे. यावेळी तारक मेहता का उलटा चष्मा फेम सोनालिका कुलकर्णी ( मिसेस भिडे ), त्यांच्या मातोश्री सौ. प्रतिभाताई कुलकर्णी या देखील उपस्थित असणार आहेत.




त्यांच्याहस्ते विविध क्षेत्रातील उत्कृष्ठ काम करणाऱ्या महिलांना शुभंकरोती राज्यस्तरीय समर्थ नारी सन्मानाने सन्मानित करणार आहेत त्यात हिरकणी सौ. गीतांजली वाणी यांना साहित्यिक क्षेत्रातील उत्कृष्ठ योगदानासाठी सन्मानित करण्यात येणार आहे. समाजातील विविध स्तरातून त्यांना शुभेच्छा दिल्या जातं आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती नाचुन नाही तर वाचुन

### मोरया मित्र मंडळाचा अनोखा उपक्रम

**दैनिक वादळ वार्ता पुणे/चैताली औटे**

मोरया मित्र मंडळ कर्वेनगर पुणे यांच्या वतीने कोथरूड, कर्वेनगर भागातील पोलीस अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, आणि कर्वेनगर ते डेक्कन भागामधील सर्व शाळांमध्ये जाऊन छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि शिवसूत्र यशस्वी जीवनाचा महामंत्र हे शिवचरित्र भेट देण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन मंडळाचे संस्थापक केदार वसंत मारणे यांनी केले होते. यावेळी ते म्हणाले मोरया




मित्र मंडळ सतत सामाजिक उपक्रम राबवत असते , गेल्या ४ वर्षा पासून शिवाजी महाराज जयंती नाचून नाही वाचुन साजरी करावी हि संकल्पना आली कारण शिवाजी म्हणजे -शि म्हनजे शिका,वा म्हणजे वाचा,जी म्हनजे जिंका.म्हणून शिक्षण घेणाऱ्या मुलांना शिवाजी महाराज कळावे म्हणून आम्ही हि पुस्तके त्याच्या पर्यंत पोहचवत आहोत.आम्हाला शिवछत्रपती आणि संभाजी महाराजांच्या विचारांची पिढी निर्माण करायची आहे.म्हणून त्यांच्यावर संस्कार व्हावेत म्हणून आम्ही हा उपक्रम राबवत आहे. शिवचरित्र हे प्रेरणादायी आहे. भविष्यात विद्यार्थी शिवचरित्राचं वाचणं केल्यानंतर जग जिंकल्या शिवाय राहणार नाही असं वाटतं.हे शिवचरित्र माजी नगरसेविका जयश्री गजानन मारणे आणि भारतीय इतिहास संशोधक मंडळ सभासद मंगेश नवघणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी साह्यक आयुक्त वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय विजय नायकल साहेब मंडळाचे अध्यक्ष रोहिदास जाधव,स्वाती दारवटकर, पौर्णिमा केसवड,अनिल आठवले,अथर्व भरम,मुख्याध्यापक,शिक्षक उपस्थित होते .

शिक्षकांना देखील हा उपक्रम खूप आवडला ते म्हणाले मोरया मित्र मंडळाचा खूप छान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असेच उपक्रम भविष्यात सर्व मंडळांनी राबविले पाहिजेत .

## जरांगे पाटील यांनी बोलावलेल्या बैठकीत हाणामारी

**दैनिक वादळ वार्ता**
**सिन्नर/सुरेश इंगळे**

लोकसभा निवडणुकीत प्रत्येक मतदारसंघातून एक उमेदवार उभा करावा त्या संदर्भात ३० तारखेच्या आत बैठका घेऊन निर्णय कळवा असे आव्हान मराठा आंदोलक जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला केलं होत. या पार्श्वभूमीवर मराठा समाजाच्या वतीने बैठकांचे अनेक ठिकाणी आयोजन केले जात आहे. लोकसभा निवडणुकीसाठी कोणता उमेदवार ठरवायचा यासाठी या आढावा बैठकामध्ये चर्चा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर मध्ये देखील मराठा समाजाच्या वतीने बैठकीचा आयोजन करण्यात आलं होतं या बैठकीत मोठा राडा झाला आहे. हाणामारीची घटना देखील घडली आहे.. याबाबत मिळालेली माहिती अशी की, बैठकीत उमेदवार ठरवताना वाद झाला एकमत न झाल्याने हा वाद विकोपाला गेला आणि एकमेकांवर हल्ला करण्यात आला. लोकसभा निवडणुकीसाठी कोणत्याही उमेदवाराचं नाव समोर आलं नाही. पण समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली, काही काळ तणाव निर्माण झाला होता, बैठकीतील कार्यकर्त्यांनी सांगितले की मराठा समाजाच्या चार-पाच लोकांनी मीटिंग ठरवली होती मिटींगचे मेसेज पाहून अनेक जण आले, बैठकीत कुणीही कुणाचे नाव न घेता चर्चा सुरू होती त्याचे अपडेट मनोज जरांगे पाटील यांना देण्याचं ठरलं होतं मात्र अचानक एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू झाले आणि जोरदार राडा झाला अशी माहिती उपस्थित कार्यकर्त्यांनी दिली दरम्यान बैठकीत वाद झाल्यानंतरही कार्यकर्त्यांनी परिस्थिती सावरली आणि पुन्हा एकदा बैठक घेण्याचा प्रयत्न केला अनेक ठिकाणी बैठका सुरू असून अद्याप बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाची माहिती समोर आलेली नाही.



# मूर्ख कोण असतो?

(विश्व एप्रिल फुल डे विशेष.) या दिवशी लोक एकमेकांसोबत विनोद, मस्ती करतात, चेष्टा करतात. आजकाल लोक सोशल मीडियाच्या मदतीने या दिवसाचा खूप आनंद घेतात. मित्र, नातेवाईकांना 'एप्रिल फुल्स डे'वर मजेदार मीम्स, जोक्स आणि शायरी पाठवतात. मात्र आपण एप्रिल फुल्स डे साजरा करण्यामागचं कारण माहिती करून घेण्यासाठी श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख जरूर वाचा... संपादक.

एप्रिल फूल दिन हा एप्रिल महिन्याचा पहिला दिवस होय. या दिवशी गमतीने एखाद्यास मूर्ख बनविण्याची प्रथा पाश्चिमात्य राष्ट्रांत प्रामुख्याने दिसून येते. मूर्ख बनलेल्या व्यक्तीस एप्रिल फूल म्हणण्याचा प्रघात आहे. या प्रथेची सुरुवात केव्हा व कशी झाली हे निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि काही लोक तिचा संबंध प्राचीन रोममधील व्हीनस व फॉर्चुना व्हिरिलीस या देवतांच्या उत्सवाशी लावतात. ग्रेगोरियन पंचांग १५६४ साली स्वीकारल्यानंतर फ्रान्समध्ये या प्रथेस सुरुवात झाली व ती १६०० पर्यंत इतरत्र पसरली असेही म्हटले जाते. काही लोक त्यास लूच्या वसंतोत्सवाची स्मृती मानतात. प्राचीन रोममधील हिलेरिया व भारतातील होळी या उत्संवाशी या एप्रिल फूलचे बरेच साम्य आहे. होळी व हिलेरिया यांच्याप्रमाणेच हा प्रकार वसंतागमनाच्या वेळीच साजरा करतात. मेक्सिकोत २८ डिसेंबरला हा दिवस पाळतात. त्या दिवशी उसनी घेतलेली वस्तू परत न करण्याची तेथे प्रथा आहे. मूर्ख बनलेल्या व्यक्तीस इंग्लंडमध्ये एप्रिल फूल, स्कॉटलंडमध्ये एप्रिल गॉक व फ्रान्समध्ये एप्रिल फिश म्हणतात. ब्रिटिशांच्या अंमलाबरोबर ही प्रथा भारतात आली. या दिवसास सकल मूर्खांचा दिवस असेही म्हणतात.

हा दिवस अनेक देशांमध्ये १ एप्रिलला साजरा केला जातो. या दिवशी मित्रांच्या खोड्या काढल्या जातात किंवा त्याच्यावर विनोद केले जातात. याचा एकमात्र उद्देश त्यांना ओशाळवणे हाच असतो. एप्रिल फूल साजरा करण्याची सुरूवात फ्रान्समधून झाली असे म्हटले जाते. पॉप ग्रेगरी १३ यांनी १५८२ साली प्रत्येक युरोपियन देशाला ज्यूलियन कॅलेंडर सोडून ग्रेगोरियन कॅलेंडर वापरण्याचे निर्देश दिले. ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये नवे वर्ष हे १ एप्रिलपासून नाही तर १ जानेवारीपासून सुरू होतं. अनेक लोकांनी हे मानण्यास नकार दिला तर काहींना याबद्दल माहितीही नव्हती. यामुळे ते नववर्ष १ एप्रिललाच साजरे करतात. अशांना एप्रिल फूल म्हटले जाऊ लागले. यादिवशी प्रँक करून एकमेकांना मुर्ख बनवू लागले. बघता बघता ही प्रथा युरोपमध्ये पसरली. या दिवशी लोक एकमेकांसोबत विनोद, मस्ती करतात, चेष्टा करतात. मूर्ख कोण असतो? इतरांना मूर्ख बनविते, खरेतर तोच खरा मूर्ख असतो. आजकाल लोक सोशल मीडियाच्या मदतीने या दिवसाचा खूप आनंद घेतात. मित्र, नातेवाईकांना "एप्रिल फुल्स डे" वर मजेदार मीम्स, जोक्स आणि शायरी पाठवतात. मात्र तुम्हाला एप्रिल फुल्स डे साजरा करण्यामागचं कारण माहिती आहे का? एप्रिल फुल डे साजरा करण्यामागे दोन कथा प्रचलित आहेत. एप्रिल फुल डे मागची पहिली प्रचलित कथा- इंग्लंडचा राजा रिचर्ड द्वितीय आणि बोहेमियाची राणी ॲनी यांनी ३२ मार्च १३८१ रोजी त्यांच्या लग्नाची घोषणा केली. लग्नाच्या बातमीने जनतेमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, कॅलेंडरमध्ये ३२ मार्च ही तारीख नसते. राजा-राणीने लग्नाची खोटी माहिती देऊन लोकांना मूर्ख बनवले होते, तेव्हापासून हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. ३२ मार्च हा दिवस नाही म्हणून १ एप्रिल हा दिवस एप्रिल फूल डे म्हणून साजरा करण्यात आला.

यामागची दुसरी कथा अशी आहे की, फ्रान्समध्ये १५८२ मध्ये पोप चार्ल्स यांनी जुन्या कॅलेंडरच्या जागी नवीन रोमन कॅलेंडर सुरू केले. मात्र, त्यानंतरही काही लोक जुन्या तारखेनुसार नवीन वर्ष साजरे करत होते. त्यामुळे जुन्या कॅलेंडरनुसार नवीन वर्ष साजरे करणाऱ्यांना एप्रिल फूल म्हटले गेले. तेव्हापासून १ एप्रिल हा दिवस एप्रिल फूल डे म्हणून साजरा करण्यात आल्याचं सांगितलं जातं. एखाद्याचा वेळ, पैसा आणि बुद्धी व्यर्थ खर्ची पाडून वेड्यात काढणे, हे शहाण्यांना शोभते का? विचारमंथन अवश्यच व्हावे. !! कुणालाही मूर्ख बनविणे कदापिही योग्य नाही, एखाद्याच्या नजरेतून आपण कधीही उतरून नये !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

# आंबेडकरी जनता षडयंत्रकारी प्रचाराला कधीही बळी पडणार नाही

अमरावतीचा अस्वजीत भातकुले यांनी अकरा मुद्दे उपस्थित करून त्याला आंबेडकर विरोधी फोबिया झाला असल्याचे व तो भाजपाच्या आयटी सेलचा पेड कर्मचारी असल्याची माहिती समोर आलेली आहे.

तो आणि त्याच्या सारख्या वंचित बहुजन आघाडी आणि आंबेडकर द्वेषाच्या विरुद्ध न्यूनगंडाने पछाडलेल्या लोकांना व्हीबीएच्या उपाध्यक्ष दिशा पिंकी शेख हिने आणि खुद ॲड प्रकाश आंबेडकर साहेबांनी त्यांच्या फेसबुक द्वारे किती पाठीमागची षड्यंत्र आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांची भूमिका याबद्दल तपशीलवार पणे निवेदन प्रसिद्ध केलेले आहे.

सर्वसाधारणपणे असे विरोधी लेखन प्रसारित झाले कीं, सामान्य राजकीय कुवतीच्या माणसाला प्रकाश आंबेडकर यांचा राजकीय अपरिपक्वपना आहे असाच गैरसमज होण्याची शक्यता निर्माण होते.

परंतु महाविकास आघाडीच्या एकूणच बैठकांचा आढावा घेऊन सूक्ष्म अवलोकन केल्यास फक्त ढोबळ मुद्दे आपल्या नजरेस आणू इच्छितो.

(१) मवीआतील राष्ट्रवादी शरद पवार, शिवसेना ठाकरे गट, आणि काँग्रेस हे प्रत्येक बैठकामध्ये लोकसभेसाठी आपापले उमेदवार आणि त्यांचे लोकसभा मतदारसंघ ठरवत होते हे खरे नव्हे काय?

(२) मविआतील किती बैठकांच्या मध्ये या वरील ३ पक्षांच्या समवेत वंचित बहुजन आघाडी समवेत सीट शेअरिंग झालेली आहे? झाली असल्यास लोकसभा मतदारसंघाचे नाव आणि त्याबाबतचा इतिवृत्तान्त माध्यमांच्या समोर का नाही दिला गेला?

(३) प्रसार माध्यमांच्या संजय राऊतच्या एकूण मुलाखतीमध्ये वंचित बहुजन आघाडीची गरज आहे, "आम्ही त्यांना ३ तर नंतर नंतर ४ जागा देत आहोत " अशी विधाने करावयाची. पण वंचित साठी कोणते कोणते मतदार संघ देत आहोत याचा कधीतरी नामोल्लेख झालेला आहे का?

कोल्हापूर, सांगली,भिवंडी, सह १५ जागांचा काँग्रेस विरुद्ध शिवसेनेचा तिढा अजूनही सुटलेला नसताना वंचित आघाडीला त्यांना त्यांच्या जागेची आणि उमेदवारांची तयारी करता येऊ नये म्हणून सतत भ्रमात ठेवणे म्हणजेच युतीच्या गाफीलपणात अडकवून ठेवणे. हे षडयंत्र न ओळखण्याइतके वंचित चे पदाधिकारी आणि नेतृत्व अविवेकी आहे काय?

(४) जसे पहिल्या पंक्तीत जेवत असताना व्हीआयपी माणसांना त्यांच्या त्यांच्या सोयीप्रमाणे गरम गरम मीष्टांन्न भोजन द्यायचे. आणि शिळेपाकी राहील ते अगदी गरीब सामान्य, प्रतिष्ठाहीन माणसांना मोठमोठ्या हाका मारून शिल्लक उरलेले अन्न द्यायचे. या न्यायाने मवीआ यांचे वर्तन असेल तर यांच्यातील सरंजाम दारी, आणि प्रस्थापित घरंदाज पणा अजूनही गेलेला नाही हे प्रतीत होत नाही का?

(५) ज्यांच्या सभेला पैसे वाहने पुरवून सुद्धा दहा ते बारा हजाराच्या पुढे लोक एकत्रित जमत नाहीत. उलट पक्षी वंचित आघाडीच्या कोणत्याही सभेला 70-80 हजार ते तीन लाखापर्यंतचा जनसमुदाय स्वखर्चाने येतो. तो पर्यटन म्हणून येतो का?

(६) लोकशाही संविधान वाचण्यासाठी आंबेडकर हवे आहेत म्हणून हाकाटी द्यायची. आणि संविधान वाचविण्याचीं सर्व जबाबदारी प्रकाश आंबेडकर आणि आंबेडकरी जनतेच्या डोक्यावर ठेवायची.

राष्ट्रवादी,काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट यांना संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठीचीं गरज वाटत नाही का?

(७) शरद पवार यांच्या सिल्वर ओक या निवासस्थानी वंचितला बोलणी करण्यासाठी का बोलावले नाही? तिथे प्रकाश आंबेडकर यांना पराभूत करण्यासाठी उमेदवार देण्याबाबत चर्चा झाली हे वास्तव समोर असताना या गनिमी काव्यांना वंचित ने बळी पडावे असे वाटते का?

, (8) कॉमन मिनिमम प्रोग्राम ठरत असताना निवडून आल्यानंतर भाजपाच्या गोटात न जाण्याबद्दल बंधपत्र आणि मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाबाबतची भूमिका या मुद्द्यांच्या बाबत बैठकीत बगल? फाटा का देण्यात आला?

(९) आजही शरद पवारांची राष्ट्रवादी आणि भाजपाचे इंटरनल रिलेशन मधुर आहेत की अत्यंत टोकाचे आहेत.

(10) काँग्रेस शिवसेना राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षातील एकेक डझनाहुन अधिक आपला भ्रष्टाचार लपविण्यासाठी स्थिरस्थावर झालेले आहेत. पक्ष सोडून गेलेल्या खासदारांच्या जागा प्रत्येक विभाजित पक्षाने आपल्याच आहेत असे गृहीत धरून ईडीसीबीआयच्या भीतीमुळे " पळा पळा कोण कोणाच्या पुढे पळतो आहे " अशी स्पर्धा लागलेली असताना आणि राष्ट्रीय पक्षाचे तीन तेरा वाजले असताना त्या जागा आमच्याच पक्षाच्या आहेत असे म्हणणे म्हणजे हा किती बेरकीपणा?

(११) लोकांच्या समोर भाजपचे भूत उभे करायचे, आणि जेव्हा जेव्हा आंबेडकरी विचारांचा पक्ष मूळ आणि जोर धरू पाहत असतो तेव्हा तेव्हा भारिप बहुजन महासंघ ते वंचित बहुजन आघाडी यांच्यासाठी एबीसीडी अशी इंग्रजी अक्षरे शोधायची आणि ती त्यांच्या पाठीमागे चिटकवून टाकायची म्हणजे नवरा मरतोय याची खंत नाही, पण सवत रंडकी झाली पाहिजे ही भूमिका ठेवून हे प्रस्थापित राजकीय पक्ष प्रकाश आंबेडकर आणि वंचित सोबत असे वर्तन करत असतील बौद्धिक अधिष्ठान, बुद्धी प्रामाण्यवाद, वास्तवाची चिकित्सा करणे, धुरंधरपणा, मुत्सद्दी राजकारण हे आंबेडकरी जनतेला समजत नाही असे म्हणायचे का?

आज दिनांक २९ मार्च च्या लोकसत्ता मध्ये शेकडो हजारो कोटींचा घोटाळा करणारे प्रफुल्ल पटेल, नारायण राणे, अजित दादा पवार, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, प्रताप सरनाईक, नवाब मलिक, भावना गवळी, यशवंत जाधव, माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई, हिमांता बिस्व शर्मा, पश्चिम बंगालचे विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी हे पूर्वी कोणत्या पक्षात कार्यरत होते? आणि त्यांच्या हजारो कोटीच्या भ्रष्टाचारांची प्रकरणे बंद करण्यात आल्याची गॅरंटी भाजप सरकारने दिली आहे.

तशाच ग्यारंट्या महाविकास आघाडीतील घटक पक्षांना हव्या आहेत का? आणि हे जर असे नसेल तर वंचित आघाडी सोबत जागा वाटप करताना समोरासमोर सीट शेअरिंग डिस्कस का झाली नाही?

म्हणजेच याचा अर्थ असा की आम्ही आमच्या सोयीने आमच्या जागा घेऊ, आणि आमच्या संपल्यानंतर भांडणे मिटल्यानंतर उरलेल्या जागा आम्ही तुम्हाला देऊ. म्हणजे महाविकास आघाडी वाले जागांची भिक देणार आणि आम्ही त्या जागा देतील ती बिग स्वीकारणार.

तुम्हाला तुमची आवड आहे परंतु आम्हाला आमच्या जागा निवडण्याची मुभा नाही असेच का?

आंबेडकरी विचारांचा पक्ष मोठा होऊ द्यायचा नाही हे प्रस्थापित राजकारणी पक्ष्यांचे षडयंत्र असल्याने तो खोटा जहरी अविवेकशील प्रचार करत असतात. कृपया आंबेडकरी जनता बुद्धिवादी आहे, विचारशील आहे, जाणकार आहे, आणि जातीवाद्यांचे डावपेच वेळीच ओळखणारी असल्याने आशा षडयंत्रकारी प्रचाराला आंबेडकरी जनता, मराठा बहुजन, मुस्लिम अल्पसंख्यांक, धनगर समूह, आणि ओबीसी मतदार बळी पडणार नाही.

**( अनंतराव सरवदे,**
**सेवानिवृत्त तहसीलदार तथा लेखक विद्रोह वंचितांचा,**

# उदयनराजे यांचं नाव घेताच शरद पवार यांनी उडवली कॉलर

माजी केंद्रीय मंत्री शरद पवार सातारा दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात शरद पवार यांनी आधी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर मीडियाशी संवाद साधत विविध प्रश्नांची उत्तरे दिली. साताऱ्याच्या जागेपासून ते वंचित बहुजन आघाडीपर्यंतच्या प्रश्नाला शरद पवार यांनी उत्तरे दिली. यावेळी शरद पवार यांना छत्रपती उदयनराजे भोसले यांच्याबाबत विचारणा करण्यात आली. त्यावर शरद पवार यांनी उदयनराजे भोसले यांची हुबेहुब नक्कल करत कॉलर उडवून दाखवली.

उदयनराजे यांनी तुम्हाला साताऱ्याच्या जागेसाठी संपर्क केला का? त्यांच्याशी तुम्ही चर्चा करणार आहात का? असा सवालही शरद पवार यांना केला. उदयनराजेंसारखी कॉलर उडवणार का? असा सवालही यावेळी विचारण्यात आला. त्यावेळी शरद पवार यांनी उदयनराजेंसारखी कॉलर उडवली. त्यामुळे एकच हशा पिकला. आपल्या या नकलेवर खुद्द शरद पवारही दिलखुलास हसले. साताऱ्यात राष्ट्रवादीचाच उमेदवार राहणार आहे. उदयनराजेंनी आपल्याशी संपर्क केला नाही. उदयनराजे आता भाजपमध्ये आहेत. काल त्यांचं सातारकरांनी केलेलं स्वागत मी पाहिलं. रस्त्यावर गर्दी झाली होती, असं शरद पवार म्हणाले. चव्हाणांना उमेदवारी नाही पृथ्वीराज चव्हाण यांना साताऱ्याची जागा देणार का? असा सवालही करण्यात आला. त्यावर साताऱ्याची जागा राष्ट्रवादीची आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचाच उमेदवार इथे उभा राहील, असं शरद पवार यांनी स्पष्ट केलं. विद्यमान खासदार श्रीनिवास पाटील यांनी वैद्यकीय कारणामुळे निवडणूक लढण्यास नकार दिला आहे. त्यांच्या प्रकृतीची तुमच्यापेक्षा मला जास्त माहीत आहे. निवडणुकीत संघर्ष करण्यासारखी त्यांची प्रकृती नाही. त्यामुळे साताऱ्याबाबत काय निर्णय घ्यायाच याबाबत तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या मनाचा कानोसा घेण्यात आला आहे. दोन चार लोकांची नावे सुचवली गेली आहेत. संध्याकाळच्या बैठकीत अहवाल मांडून विचारविनियम केला जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

# गप्पेवाडी येथील युवकाचा खून ? घातपात झाल्याचा पत्नीसह नातेवाईकांचा संशय ?

**वादळवार्ता/केज**

तालुक्यातील गप्पेवाडी येथील युवकाचा खून पूर्ववैमनस्यातून झाला असल्याचा संशय पत्नीसह नातेवाईकांना केला आहे. बुधवार ( दि.२७ ) रोजी मयत दत्तात्रय संदीपान केदार हा आपल्या बहिणीला आणण्यासाठी नारेवाडी येथे गेला व तेथून तिला घेऊन गप्पेवाडी येथे आला. व मला माझ्या मित्रांनी जेवायला बोलावले आहे असे म्हणत बुधवार ( दि. २७ ) रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास स्वतःची मोटार सायकल न घेता मित्रांच्या गाडीवर बसून त्यांनी पिंपळगाव ते विडा दरम्यान घातपात करून डोक्यात टॉमी व मोठे दगड घालून डोक्याचा चेंदामेंदा करून टाकला होता आणि मयत दत्तात्रय हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. मयताची ओळख पटू नये म्हणून त्याचा चेहरा विद्रूप करून टाकला होता. सदरील मयत हा दोन दिवसापासून बेपत्ता होता. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी केज पोलिसांशी संपर्क साधून केज पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेत पंचनामा करून केज येथील उपजिल्हा रुग्णालयात ठेवला होता. या घटनेतील मयताची ओळख पटावी म्हणून पोलिसांनी प्रेस नोट काढून मयताची ओळख पटविण्याचे आव्हान केले होते. तर केज तालुक्यातील गप्पेवाडी येथील दत्तात्रय संदीपान केदार हा दोन दिवसापासून बेपत्ता होता. शुक्रवार ( दि.२८ रोजी ) मयताची ओळख पटली . आणि पत्नीसह नातेवाईकांनी पोलिस ठाणे गाठून घातपात असल्याचा संशय व्यक्त करत आरोपींना ताब्यात घेतल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही. असा आक्रमक पवित्रा घेत पोलिस ठाण्यात ठिय्या मांडला. अखेर पोलिसांनी आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेऊन त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुले असा परिवार आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक महाजन, पोलिस उपनिरीक्षक शिंदे हे करत आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पुण्यात नवे राजकीय समीकरण?वसंत मोरेंनी घेतली आंबेडकरांची भेट

## वसंत मोरे वंचितकडून पुणे लोकसभा

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/ पंकज भंडारी**

पुणे : पुणे लोकसभेची निवडणुक लढविण्यासाठी इच्छूक असलेल्या वसंत मोरे यांनी वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची आज भेट घेतली आहे. या भेटीत लोकसभा निवडणुकीबाबत चर्चा केल्याची माहिती वसंत मोरे यांनी पत्रकारांना दिली आहे. तसेच यासंदर्भात येत्या दोन ते तीन दिवसात निर्णय घेतला जाईल, असे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले आहे. मी शंभर टक्के पुणे लोकसभेची निवडणूक लढणार आहे, मी माझं नशीब समजतो की, वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी मला इथं बोलावलं आहे. मला त्यांनी पुरेसा वेळ दिला. त्यातून आमची अतिशय चांगली चर्चा झाली. पुण्यातील मतदान चौथ्या टप्प्यात होणार आहे. त्यामुळे आमच्याकडे खूप वेळ आहे, पुढील काही दिवसांत कोणता मार्ग स्वीकारायचा याबाबत निर्णय घेऊ.



पुणे लोकसभेसाठी वंचितचा उमेदवार द्यायचा की नाही, याचा निर्णय प्रकाश आंबेडकर घेतील, असेही वसंत मोरे यांनी म्हटले आहे.

# योगेश्वरी महाविद्यालयात कायदेशीर शिबीर संपन्न

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

येथील योगेश्वरी विज्ञान महाविद्यालयात कायदेविषयक शिबीर संपन्न झाले. तालुका विधी सेवा समिती व वकील संघ अंबाजोगाई यांच्या द्वारे जागतिक जल दिन, बाल विवाह प्रतिबंध कायदा व वादपूर्व समेट या विषयांवर दि.२८ मार्च गुरुवार रोजी शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर मा. न्यायमूर्ती श्री वाघ साहेब तर वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष अॅड.आर.आर. निर्मळे, संस्थेचे उपाध्यक्ष ऍड. शिवाजीराव कऱ्हाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात जागतिक जलदिन निमित्त माजी सरकारी वकील ऍड.अशोक कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. ऍड.कल्याणी विर्धे यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा बाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात न्यायाधिश वाघ साहेब यांनी समेट विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऍड.वैजनाथ वांजरखेडे यांनी केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. साखरे, कनिष्ठ महविद्यालयाचे उपप्राचार्य अजय पाठक, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी आदी या कार्यक्रमास उपस्थित होते.

# खोडाळा येथे १५ लाख रुपयांचा प्रतिबंधित सुगंधी सुपारी व तंबाखू जन्य पानमसाला जप्त

## गुटखा भरलेली वाहन मुद्देमालासह जप्त आरोपींना शनिवार पर्यंत पोलिस कोठडी

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर/सौरभ कामडी**



मोखाडा तालुक्यातील खोडाळा बाजारपेठेतील किराणा मालाचे व्यापारी भोरु बिन्नर यांचा आपल्या गाळ्यातील व ताब्यातील वाहनातील एकूण वाहनासह २५ लाख ६२ हजार १०० रुपये किंमतीचा सुमारे ९४७ किग्रॅम वजनाचा प्रतिबंधित सुगंधी सुपारी तंबाखू जन्य माल ताब्यात बाळगला असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत मिळून आला असून पोलिसांनी आरोपी व मुद्देमाल जप्त केला असून आरोपी भोरु बिन्नर (२९) आणि संजय नारायण मराठे रा.हिरावाडी पंचवटी नाशिक या दोघांना ताब्यात घेतले असून शनिवार पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आल्याचे पोलिस उपनिरीक्षक स्वप्नील सावंत देसाई यांनी सांगितले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत २ लाख ४० हजार रुपये किंमतीचा केसर युक्त विमल पान मसाला,६० हजार रुपयांची व्ही एन तंबाखू,३ लाख ७६ हजार केसर युक्त विमल पान मसाला,२४ हजार रुपयांची व्ही एन तंबाखू,५ लाख ५४ हजार रुपये किंमतीचा विमल केसर युक्त पानमसाला,६१ हजार रुपये किंमतीचा व्ही एन तंबाखू,३२ हजार रुपये किंमतीचा पारस पानमसाला,७५ हजार रुपये किंमतीचा पी वन तंबाखू,३० हजार रुपये किंमतीचा वाह पान मसाला,३ हजार ७५० रुपये किंमतीचा डब्ल्यू विविंग टोबॅको,८१ हजार ९०० रुपये किंमतीचा हिरा पानमसाला,४० हजार ९५० रुपये किंमतीचा रॉयल ७१७ तंबाखू तसेच ५ लाख ५० हजार रुपयांची सफेद रंगाची बोलेरो पिक अप एम एच १५ एच एच ७८८३,५ लाख रुपयांचा सफेद बोलेरो पिक अप टेम्पो क्र एम एच १५जी व्ही ०८८६ असा एकूण २५ लाख ६२ हजार १०० रुपये किंमतीचा वाहनासह मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर वाहने मोखाडा पोलिस ठाण्यात जप्त असून आरोपी भोरु बिन्नर व संजय नारायण मराठे या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून शनिवार पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आल्याचे तपास अंमलदार स्वप्निल सावंत देसाई यांनी सांगितले आहे. मोखाडा तालुक्यातील प्रतिबंधित तंबाखू जन्य पानमसाला जप्त होण्याची ही सर्वात मोठी कारवाई असून या घटनेमुळे मोखाडा तालुका पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कामांचा तसेच पाणीटंचाईचा घेतला आढावा



वादळवार्ता/बीड

बीड, दि.29 : जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी पाणी, चारा टंचाई , मनरेगा तसेच 39 बीड लोकसभा निवडणूकच्या अनुषंगाने 230-बीड विधानसभा मतदार संघाची आढावा बैठक मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील तहसील कार्यालयात आज झाली. या बैठकीस जिल्ह्यातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी , सुहास हजारे तसेच विविध विभागांचे कार्यालयीन प्रमुख यावेळी उपस्थित होते. यावेळी बीड तालुक्यातील पाणी, चारा टंचाई तसेच निवडणूक ही संदर्भात केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला आणि नागरिकांना पाण्याची कमतरता होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले. जिल्ह्यात चारा वाहतूक बंदी असून पशुधनाला चाराने कमी पडणार नाही याची काळजी घ्यावी असे सांगितले.

निवडणुकीच्या काळात महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण केली जाऊ शकतात त्यामुळे या अंतर्गत असणारी कामे सुरू ठेवण्याबाबत निर्देशित केले. बीड जिल्ह्यातील 230 बीड विधान सभा मतदारसंघात आचारसंहितेचे सर्व नियमांचे पालन व्हावे तसेच कुणीही आदर्श आचारसंहितेच भंग होणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. विविध निवडणूक कक्षाला यावेळी जिल्हाधिकारी यांनी भेट दिली. बीड विधानसभा मतदारसंघाच्या स्ट्राँग रूमची पाहणी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने 39 बीड लोकसभा मतदारसंघातील 230 बीड विधानसभा मतदारसंघाची स्ट्राँग रूम कृषी उत्पन्न बाजार समिती येथे असणार आहे. या जागेची आज जिल्हाधिकारी यांनी पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला. तसेच गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक येथे 39 बीड मतदार संघाच्या मतदानानंतर म्हणजे 13 मे नंतर ते मतमोजणी म्हणजे 4 जूनपर्यंत ईव्हीएम मशीन येथे राहणार असून या जागेची पूर्वतयारी कशी सुरू आहे याचाही आढावा आज जिल्हाधिकारी यांनी घेतला.

# छत्रपती संभाजीनगर लोकसभेचा नवीन चेहरा संदीप मानकर निवडणुकीच्या रिंगणात

**वादळवार्ता/संभाजीनगर**

राज्यांतील लोकसभा निवडणुका ऐरणीवर आलेल्या असतांनाच अत्यंत भावनिक व तितकाच महत्वाचा मुद्दा समोर आला आहे आणि तो म्हणजे महाराष्ट्र राज्यांत मातंग समाजाची एकूण लोकसंख्या 70 लाखांच्या आसपास असतांना देखील कुठल्याच राजकीय पक्षाने मातंग समाजाची दखल घेऊन त्यांना लोकसभेची उमेदवारी देण्याचे धाडस दाखविले नाही. किंबहुना मातंग मतांचा आतापर्यंत केवळ आणि केवळ वापर केला गेला. झेंड्याची काठी उचलल्यापासून ते पोलिसांची काठी खाईपर्यंत मातंग समाजाला पुढे केले गेले परंतु प्रतिनिधीत्व करतांना मात्र समाजातील राजकीय पक्षांना या कार्यकर्त्यांचा जणूकाही विसर पडल्याचे समोर दिसून आले. म्हणून या प्रकरणाने राज्यभरातील मातंग समाजामध्ये प्रचंड नाराजीचा सूर उमटल्याचे चित्र दिसत आहे. सरकारच्या याच धोरणाला व कुटील विषयाला आव्हान देण्यासाठी आता छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातून विकासाभिमुख नेतृत्व असलेला संदीप मानकर हा नवीन चेहरा निवडणूक लढविण्याची माहिती समोर येत आहे. त्यांनी आतापर्यंत आदर्श पत्रकारिता केली असून सामाजिक व राजकीय चळवळीमध्ये सुद्धा ते अत्यंत सक्रीय कार्यकर्ते आहेत. पत्रकारितेच्या माध्यमांतून त्यांनी कठीण विषयांत हात घालून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती संभाजीनगर



लोकसभा मतदारसंघात मातंग समाजाची लोकसंख्या एकूण 72 हजार आहे तर हीच लोकसंख्या जालना लोकसभा मतदारसंघात एकूण 66 हजार आहे. तरीदेखील या दोन्ही मतदारसंघात सुद्धा मातंग समाजाला वारंवार डावलले गेल्याचे बघावयांस मिळाले आहे. म्हणून आता आपणही योग्य भूमिका घेतल्याशिवाय पर्याय नाही या उदात्त हेतूने सकल मातंग समाजाच्या वतीने संदीप मानकर यांचे नाव छत्रपती संभाजीनगर लोकसभेसाठी समोर येत असून ते एक उमदं व सर्वसमावेशक विचारांचं नेतृत्व आहे. व मतदारसंघातील सर्वच भौगोलिक गोष्टींचा त्यांना परिपूर्ण अभ्यास व दांडगा अनुभव आहे. आपल्या धर्मपत्नीला सुद्धा त्यांनी गांवची 20 वर्षांची बिनविरोध परंपरा झुगारुन निवडणुकीतून मोठ्या दमाने निवडून आणले आहे. म्हणून समाजातून माझे नाव समोर येत असेल तर निश्चितच मी छत्रपती संभाजीनगर लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरुन केवळ मातंग समाजालाच नव्हे तर संपूर्ण मतदारसंघातील जाती-धर्मियांना सोबत घेऊन नाविन्यपूर्ण संकल्पनेतून पुढे नेण्याचा व त्यांचा भौतिक व सर्वांगीण विकास करण्याचा माझा निर्धार असेल अशी ग्वाही नवनियुक्त उमेदवार संदीप मानकर यांनी प्रसारमाध्यमांना दिली आहे. व भविष्यात छत्रपती संभाजीनगर सोबतच जालना लोकसभा मतदारसंघातून सुद्धा ते निवडणुकीला सामोरे गेले तरी यांत नवल वाटायला नको अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे.

# सौ.वसुधा नाईक यांचा आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत !!!



**दैनिक वादळ वार्ता पुणे**

पुणे :28 मार्च2024 : सुप्रसिध्द साहित्यिक , सामाजिक कार्यकर्त्या आणि वसुधा इंटरनॅशनल संस्थेच्या अध्यक्षा सौ. वसुधा नाईक यांना नुकताच तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेतर्फे ' डहाळी गौरव 2024 ' आणि युनिव्हर्सल युथ संस्थेतर्फे ' युनिव्हर्सल युथ अॅवॉर्ड 2024 ' प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार विश्वविख्यात साहित्यिक, आंतरराष्ट्रीय विचारवंत आणि पहिल्या विश्व साहित्य संमेलन अध्यक्ष डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. महिलांच्या सबलीकरणामुळे माऊलींची विश्वकल्याणाची संकल्पना साकारण्यात वसुधा नाईक यांच्यासारख्या कर्तबगार महिलांचे योगदान गौरवास्पद असते, असे प्रतिपादन याप्रसंगी डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी केले.भारतीय अध्यात्माच्या संस्कारांमुळेच मी समाजकार्यासाठी सक्रियतेने चार पावलं पुढे टाकू शकते असे वसुधा नाईक यांनी पुरस्काराविषयी कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले. वसुधा नाईक यांच्या नेत्रदिपक यशाबद्दल तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या संस्थापक, अध्यक्षा प्रिया दामले आणि वर्ल्ड क्वीन बीज संस्थेच्या अध्यक्षा सारिका सासवडे यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# नेवासा येथे सीमा सुरक्षा दल व पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने रूटमार्च चे आयोजन

**वादळवार्ता/अहमदनगर**

- सविस्तर माहिती
- आगामी काळात निवडणूक प्रक्रिया शांततेत व निर्भयी वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी सीमा सुरक्षा दल व पोलीसदल यांच्या संयुक्त विद्यमाने रूटमार्च चे आयोजन करण्यात आले होते. जनसामान्यांमध्ये विश्वास निर्माण करणे व गुन्हेगारांवर वचक निर्माण करणे यासाठी नेवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये नेवासा शहर व कुकाणा येथे शुक्रवार दि. 29 मार्च रोजी रूट मार्च चे आयोजन करण्यात आले. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन 2024 व आगामी सण उत्सव अनुषंगाने कुकाणा शहर, नेवासा फाटा, नेवासा शहर या ठिकाणी निवडणूक प्रक्रिया भयमुक्त वातावरणात व शांततेत पार पाडणे दृष्टीने सीमा सुरक्षा बल व पोलीस असा संयुक्त रूट मार्च घेण्यात आला. सदर रूट मार्च करीता सीमा सुरक्षा दलाचे कंपनी कमांडर श्री. अखिलेश कुमार गुप्ता यांचे सह 32 जवान, पोलीस ठाणे नेवासा कडील 6 अधिकारी,



25 अमलदार, 10 होमगार्ड असे सहभागी झाले होते.नेवासा तालुक्यातील रूट मार्च सकाळी 9.00 वाजता नेवासा फाटा येथे आगमन, 9.30 वाजता कुकाणा येथे आगमन,9.30 ते 10.30 कुकाणा गावामध्ये रूट मार्च, 11.00 वाजता नेवासा येथे आगमन, सकाळी 11.00 ते दुपारी 12.00 वाजता नेवासा गावामध्ये रूट मार्च, दुपारी 12.30 वाजता पाकशाळा येथे जवानांचे दुपारचे जेवण. दुपारी 13.30 वाजता अहमदनगरकडे रवाना. झाले. .सदरचा रूट मार्च हा लक्ष वेधून घेणारा ठरला. सदर रूट मार्चचा सकारात्मक परिणाम दिसून आला. सदरचा रूट मार्च मुख्यतः सर्वसामान्य नागरिकांच्या मनामध्ये सुरक्षिततेची भावना व विश्वास निर्माण व्हावा व गुन्हेगारांवर नियंत्रण राहावे हा होता. सदरचा रूट मार्च अहमदनगर जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कल्लुबर्मे, श्रीरामपूर , शेवगाव येथील उप विभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटीलसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव साहेब यांनी आयोजित केला होता.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता

# शिंदेंच्या पहिल्या यादीमध्ये श्रीकांत शिंदेंचं नाव नाही, गोविंदाच्या तिकीटाच्या चर्चाही हवेत

**दैनिक वादळ वार्ता**

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर आणि ओबीसी बहुजन पार्टीचे नेते प्रकाश शेंडगे यांच्यात अद्याप युती झाली नाही. आंबेडकर यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडल्यानंतर उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीनुसार स्वत: प्रकाश आंबेडकर हे अकोल्यातून उभे राहणार आहेत. वंचित पाठोपाठ ओबीसी बहुजन पार्टीनेही नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार पक्षाचे अध्यक्ष प्रकाश शेंडगे स्वत: सांगलीतून निवडणूक लढवत आहेत. शेंडगे यांनी ही यादी जाहीर करताना मोठा निर्णय जाहीर केला आहे. कोल्हापुरातील उमेदवार शाहू महाराज छत्रपती यांना आणि अकोल्यातील उमेदवार प्रकाश आंबेडकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे ओबीसी-दलित ऐक्याची ही वाटचाल असल्याचं मानलं जात आहे. प्रकाश शेंडगे यांनी नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार शेंडगे हे सांगलीतून लढणार आहेत. बारामतीतून महेश भागवत, परभणीतून ॲड. हरिभाऊ शेळके, हिंगोलीतून ॲड. रवी यशवंतराव शिंदे, नांदेडमधून ॲड. अविनाश भोसीकर, बुलढाण्यातून नंदू लवंगे, शिर्डीतून डॉ. अशोक आल्हाट यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर हातकणंगलेमधून मनीषा डांगे किंवा प्रा. संतोष कोळेकर यांना उमेदवारी दिली जाणार आहे.

सोशल इंजीनिअरिंग

प्रकाश शेंडगे यांनी पहिल्या यादीतून सोशल इंजीनिअरिंग साधण्याचा प्रयत्न केला आहे. ओबीसी, मराठा आणि दलित यांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच कोल्हापुरातील महाविकास आघाडीचे उमेदवार शाहू महाराज छत्रपती आणि अकोल्यातील वंचितचे उमेदवार प्रकाश आंबेडकर यांना पाठिंबा देऊन सामाजिक समीकरणावरही भर दिला आहे. मात्र, या सोशल इंजीनिअरिंगचा शेंडगे यांना कितपत फायदा होतो हे मतदानाच्या दिवशीच कळणार आहे.

तिसरी आघाडी होणार?

दरम्यान, प्रकाश शेंडगे यांनी राज्यात तिसरी आघाडी होणार असल्याचं सूतोवाच केलं होतं. प्रकाश आंबेडकर यांनीही राज्यात 2 एप्रिल रोजी भाजपविरोधी आघाडी होणार असल्याचं म्हटलं आहे. त्याच दिवशी सर्व काही चित्र स्पष्ट होणार असल्याचंही आंबेडकर यांनी म्हटलं आहे. त्यामुळे राज्यात तिसरी आघाडी होणार असल्याचं जवळपास निश्चित झालं आहे. मात्र, या आघाडीत प्रकाश शेंडगे असतील की नाही? याबाबतचं चित्र अद्याप स्पष्ट झालेलं नाही.



# घळाटवाडी ते आनंदगाव रस्त्याचे कोट्यावधी खड्ड्यात सा.बां.विभागाकडून गुत्तेदारांना पोसण्याचे काम सुरु

**वादळवार्ता/माजलगाव**

दि.२८. माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी ते आनंदगाव दरम्यानच्या रस्त्याचे काम मूळ अंदाजपत्रकाला बगल देत मनमानी पद्धतीने सुरु असल्याची बाब समोर आली आहे. काही महिन्यांपासून सुरु असलेल्या या रस्ता कामाचे कोट्यवधी रुपय खड्ड्यात जाणार असून बांधकाम विभागाने तत्काळ याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी ते आनंदगाव रस्त्यासाठी आ.प्रकाश सोळंके यांनी मंजूर करून आणला आहे. राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा रस्ता चांगला होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. परंतु, संबंधित ठेकेदारावर अधीकाऱ्यांचे अंकुश नसल्याने चित्र आनंदगाव रस्त्याच्या कामात दिसत आहे. येथील रस्त्याचे



काम निकृष्ट दर्जाचे होत असून, चालू झालेल्या या कामाकडे लक्ष दिले नाही, तर पुन्हा या रस्त्याची अवस्था मागील काही महिन्यात झालेल्या कामाप्रमाणे होणार अशी शंका परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहे. या रस्ता कामाच्या मूळ अंदाजपत्रकाला बगल देत मनमानी पद्धतीने काम करण्याचा प्रकार कंत्राटदाराकडून सुरु आहे.

# गडकोटांचे संवर्धन झाले पाहिजे. आज ते तग धरुन आहेत. हमीदा खान यांनी व्यक्त केली खंत.

**वादळवार्ता/ठाणे**

ठाणे : विश्वनाथ पंडित गडकोटांमुळे इतिहासा बद्दल आदर निर्माण होतो, इतिहासाची माहिती, महती मिळते. नुसती भटकंती न करता आपण त्याचा अभ्यास करु लागतो असे मत गडरागिणी हमिदा खान यांनी व्यक्त केले. शिवसेवा मित्र मंडळ, ठाणे पूर्व वतीने आयोजित शिवजयंती उत्सव कार्यक्रमात व्यक्त केले. गडकोटांचे संवर्धन झाले पाहिजे. आज ते तग धरुन आहे, उद्या ते दिसणारच नाही. त्यामुळे आजच त्याची काळजी




घेतली पाहिजे आणि ते जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे कळकळीचे आवाहन हमिदा यांनी केले. ६५० किल्ले सर करणाऱ्या दुर्गकन्या हमिदा यांची “शिवाजीमहाराजांच्या गड-दुर्गांची भ्रमंती” याविषयावर शिवकालीन नाणी संग्राहक, अभ्यासक प्रशांत ठोसर यांनी घेतलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या. हमिदा यांनी ६५० किल्ले सर करताना आलेले अनुभव, अडचणी, मित्रांकडून मिळालेली प्रेरणा हे सांगत आप्पा परब यांनी दिलेले प्रोत्साहन याचा प्रवास उलगडला. माझी गड कोटांची सुरूवात १९९० साली रायगड पासून झाली खरी पण १९९८ साली रायगडला पुन्हा भेट दिल्यावर आप्पांनी रायगडच्या इतिहासाचा खडान खडा सांगितला त्यावेळी सगळेच गडकोट बघण्याचा निश्चय केला आणि १९९९ साली मी एका वर्षात १०० किल्ले सर केले.

# मुलाच्या जन्मदिनी माणुसकीचे मूल्य संवर्धित उपक्रम : आयुष अडागळेचा वाढदिवस उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव / प्रतिनिधी**

वाढदिवस म्हंटल की, अमाप खर्च होतो.मात्र या खर्चाला फाटा देऊन पत्रकार बाळासाहेब अडागळे यांनी त्यांचा मुलगा आयुष याचा वाढदीवस अगदी कौतूकास्पद साजरा केला. हा जन्मदिन मुख बधिर विद्यालयातील मुलांना शैक्षणिक साहित्य अन् खाऊचे वाटप करुन साजरा केला.त्यामुळे माणुसकीचे मूल्य संवर्धित झाले असून पत्रकार बाळासाहेब अडागळे यांचे कौतूक होत आहे.

माजलगाव शहरातील जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचिलीत मुख बधिर विदयालय आयोजित ववाढदिवस कार्यक्रमास उद्योजक राम राठोड, सुनिल डोंगरे, रविकांत राठोड, अनिल खंडागळे, नारायण राठोड, प्रचंड सोळंके, मुख्याध्यापक ए.एम. ढास,, एम. आर अधीक्षक पाटील, यु.एम आगळे, आर.बी. सुतार, आदी उपस्थित होते. यावेळी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी प्रत्येकानी आपल्या वाढदिवसाचा व्यर्थ खर्च



गोरगरीब मुलांसाठी खर्च करावा, महाराष्ट्राची आदर्श संस्कृती दाखून द्यावी असे मत सर्व प्रमुख पाहुण्यानी व्यक्त केले. यावेळी आश्रमातील विदयार्थ्यांना शालेय साहित्य , खेळाचे साहित्य,गोड जेवण देण्यात आले. यावेळी बहूसंख्ये विद्यार्थी उपस्थित होते. माजलगाव तालुक्यातील पत्रकार परमेश्वर सोळंके, अमर साळवे, बाळासाहेब उपाडे, पृथ्वीराज निर्मळ,विजय कापसे,सिद्धेवर गायकवाड, शेख मुजफर यांच्यासह आदींची उपस्थिती होती. वाढदिवसाच्या दिवशी आर्थिक उधळपट्टी करीत वाढदिवस साजरा करणारे अनेक जण असतात.पण मुकबहिर लहान मुला-मुलींच्या चेहऱ्यावर माझ्या मुलाचा वाढदिवसाच्या दिवशी आनंद फुलविणारे फारच कमी असतात. ‘वाढदिवस’ लहान मुला मुलीं बरोबर साजरा केला आणि जगातील सगळ्यात सुंदर गिफ्ट त्यांनी मला दिल ते म्हणजे ‘आनंद’ आणि ‘समाधान या मुला-मुलींच्या चेहऱ्यावरील हास्य फुलल्याने माझ्या आयुष बाळाचा वाढदिवस खऱ्या अर्थाने साजरा झाला. पत्रकार बाळासाहेब आडागळे

# पंकजाताई मुंडे यानी बाबुराव पोटभरे यांची घेतली भेट

**वादळवार्ता/बीड**

!

माजलगाव (प्रतिनिधी ) माजलगाव तालुक्यातील बहुजन नेतृत्व म्हणून बाबुरावजी पोटभरे यांची क्रेझ निर्माण झाली असून लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी लक्षात घेता सर्वच पक्षाच्या राजकीय नेत्यांनी बाबुरावजी पोटभरे यांच्या शाक्य बंगल्यावर जाऊन भेटी घेऊन गळ घालण्यास सुरुवात केली आहे

माजलगाव तालुक्याचे बहुजन नेतृत्व स्वर्गीय मुंडे साहेबांचे मित्रसमान मानसपुत्र बाबुरावजी पोटभरे यांनी मराठा आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून मी सदैव गरीब मराठ्यांसोबत बहुजना सोबत असल्याचे आपल्या कामातून दाखवून दिले यामुळे पोटभरे यांची सर्वच समाजात एक चांगली क्रेझ निर्माण झाली आहे मराठा,मुस्लिम, दलित, तरुणांच्या कामासाठी मदतीसाठी धावून जाण्याचा एक प्रकारे विडाच पोटभर यांनी उचलल्याचे दिसून येत असल्यामुळे पोटभर हे प्रत्येक समाजाला आपलेसे वाटू लागले आहे ही बाब लक्षात घेऊन राजकारण्यांनी शक्य बंगल्यावर भेटी देऊन मदतीसाठी याचना करण्यास सुरुवात केली आहे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे संभाव्य उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी प्रथम भेट घेतली तर शिवसंग्राम च्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनीही भेट घेतली त्यानंतर आज भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस व बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनीही भेट घेऊन लोकसभा निवडणुकी संदर्भात चर्चा केली यावेळी पोटभरे साहेबांनी तुम्ही माझी बहीण आहात असे म्हण7त येथोच्छ स्वागत सत्कार करून सन्मान केला मुंडे साहेब मला मुलगा म्हणत होते पंकजाताई तुमची छोटी बहीण आहे त्यांना शेवटपर्यंत साथ द्या असं मुंडे साहेब हमेशा बोलायचे त्यामुळे पंकजाताई या माझी छोटी बहीण असल्याने त्यांचे माझे कौटुंबिक संबंध आहेत राहतील असे सांगून त्यांचे कायम माझ्या घरी स्वागतच असेल असे पोटभरे म्हणाले मात्र बाबुरावजी पोटभरे यांचे राजकीय प्रस्थ वाढले आहे सर्वच समाजात एक निर्माण झाले आहे.



दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620
घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र